क्रमांक.सामान्य/कक्ष-१/टे-३/आस्थापना
एस.आर- ०५/२०१६
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक :- १८/०३/२०१६

विषय :- दि.१ जानेवारी २०१४ व दि. १ जाने २०१५ रोजी कार्यरत असलेल्या हवालदार ,नाईक, शिपाई, पहारेकरी व स्वच्छक संवर्गातील कर्मचा-यांची तात्पुरती जेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

ज्ञापन :-

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र. २८४/१२, दि.२१/१०/२०११ मधील तरतुदीनुसार ठाणे जिल्हा आस्थापनेवरील स्थानान्न हवालदार ,नाईक, शिपाई, पहारेकरी व स्वच्छक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०१४ व दि. १/१/२०१५ रोजीची ज्येष्ठता दर्शविणारी अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत येत आहे. सदर यादी प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसांच्या आत त्यावर हरकत/ सुचना दाखल करता येतील. सदर हरकती/ सुचना कार्यालय प्रमुखांच्या अभिप्रायासह पाठवाव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकती/ सुचना विचारात घेतल्या जाणार नाही.

१. दिनांक १/१/२०१४ रोजीची जेष्ठता यादी एकाच भागात आहे.

२. दिनांक १/१/२०१५ रोजीची जेष्ठता यादी दोन भागात प्रसिध्द करण्यांत येत आहे.

भाग - १ मध्ये सन २०१४ च्या यादीत नसलेले परंतु (दिनांक १/१/२०१५ रोजी कार्यरत असलेले) नव्याने चतुर्थश्रेणीमध्ये भरती झालेल्या कर्मचाऱ्यांची यादी आहे व भाग- २ मध्ये सन २०१४ च्या जेष्ठता यादीत नावे असलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

सर्व कार्यालय/ शाखा प्रमुख यांनी सदरची अंतरिम ज्येष्ठता यादी त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधीत हवालदार ,नाईक, शिपाई, पहारेकरी व स्वच्छक यांचे निदर्शनास आणावी.

स्वाक्षरी/-
(डॉ. अश्विनी जोशी)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रत :- मा. विभगीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचे माहितीसाठी सविनय सादर

प्रत:- १. मा. अपर जिल्हाधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार
२. अपर/ उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी ठाणे/ उल्हासनगर
३. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे
४. विशेष भुसंपादन अधिकारी ठाणे/ सुर्या प्रकल्प/ लघुपाटबंधारे/ उल्हास खोरे प्रकल्प/ मेट्रो सेंटर नं. ३ ठाणे
५. उप विभागीय अधिकारी ठाणे/ भिवंडी /कल्याण /उल्हासनगर /डहाणु/जव्हार/ पालघर/ वाडा/ वसई
६. तहसिलदार (सर्व)
७. शाखा प्रमुख (सर्व), जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

जिल्हाधिकारी ठाणे करिता